**N.C.R.B (एन.सी,आर.बी)**
**I.I.F.-I (एकीकृत अन्वेषण फॉर्म - १)**

पोलीस स्टेशन, रामनगर जि. चंद्रपूर

# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** चंद्रपुर **P.S.(ठाणे):** रामनगर

**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0218 **Year (वर्ष):** 2025

**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 06/03/2025 23:52

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7(a) |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**

1. **Day(दिवस):** दरमियानी दिन
**Time Period (कालावधी):**
**Date From (दिनांक पासून):** 01/03/2025
**Date To ( दिनांक पर्यंत):** 06/03/2025
**Time From (वेळेपासून):** 13:30 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 12:00 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**

**Date (दिनांक ):** 06/03/2025 **Time (वेळ):** 21:00 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**

**Entry No. (नोंद क्र.):** 072

**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 06/03/2025 23:52 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**

1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**

उत्तर, 1 किमी **Beat No. (बिट क्र.):**

(b) **Address (पत्ता):** पंचायत समिती कार्यालय, चंद्रपूर मुख्य प्रवेश व्दार,चंद्रपूर

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):

**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**

**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): शुभम विठ्ठल मुळे
(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :
(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1983
(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत
(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):
(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):
**Date of Issue** (दिल्याची तारीख):
**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):
(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| **S.No.** (अ.क्र.) | **ID Type** (ओळखपत्राचा प्रकार) | **ID Number** (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Address Type** (पत्याचा प्रकार) | **Address** (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | गौरी तलाव वार्डबाबुपेठ ,चंद्रपूर,चंद्रपूर,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | गौरी तलाव वार्डबाबुपेठ ,चंद्रपूर,चंद्रपूर,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):
(j) **Phone number** (फोन नं.):
**Mobile** (मोबाइल नं.): 91-9766880749

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| **S.No.** (अ.क्र.) | **Name** (नाव) | **Alias** (उर्फनाव) | **Relative's Name** (नातेवाईकाचे नाव) | **Present Address** (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | विकास सुधाकर तेलमासरे | | | 1. गौरक्षण वार्ड बामणी,बल्लारशा, चंद्रपूर,रामनगर,चंद्रपुर,महाराष्ट्र, भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रानिक सामान | मोबाइल फोन | सॅमसम कंपनीचा व रेडमी कंपनीचा मोबाईल 2 | 15,000.00 |

| **S.No.** (अ.क्र.) | **Property Category** (मालमत्ता वर्ग) | **Property Type** (मालमत्ता प्रकार) | **Description** (वर्णन) | **Value(In Rs/-)** (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 2 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 500 रू दराचा 10 नोटा | 5,000.00 |
| 3 | इतर | घरगुती वस्तु | फुलपॅन्ट | 0.00 |
| 4 | इतर | यंत्र-उपकरण/उपसाधन | सॅनडिक्स कंपनी 32 GB क्षमता 4 मेरी कार्ड | 0.00 |

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

20,000.00

11.**Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| **S.No.** (अ.क्र.) | **UIDB Number** (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12.**First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

मुळ फिर्याद कागदपत्र समाविष्ठ करण्यात आली

फिर्याद

पो स्टे रामनगर,जि.चंद्रपुर
दिनांक:- 06/03/2025

मी वर नमुद पत्त्यावर आई-वडीलांसह राहतो व शेतीचा व्यवसाय करतो. माझे शिक्षण पॉलीटेक्नीक चे व्दितीय वर्षापर्यंत झालेले आहे. माझे वडील श्री. विठ्ठल मुखरू मुळे हे डब्ल्यू.सी.एल. दुर्गापूर कोळसा खाण येथून सन 2023 मध्ये सेवानिवृत्त झाले आहेत.
श्री. दिलीप मंडल रा. चंद्रपूर यांची मौजा अजयपूर ता. जि. चंद्रपूर येथील सव्हे नंबर 187 मधील हे.0.80 आर. शेतजमीन विकत घेण्याकरिता दिनांक 05/06/2024 रोजी श्री. दिलीप मंडल यांचेशी मी शेतजमीनीचा खरेदी विक्रीबाबतचा करारनामा केला होता. परंतु त्यानंतर श्री. दिलीप मंडल हे मरण पावल्याने सदर जमीन ही त्यांचे वारस श्रीमती बिचीत्रा दिलीप मंडल, प्रिया दिलीप मंडल आणि गणेश दिलीप मंडल यांचे नावे झाली.
दिनाक 03/01/2025 रोजी मौजा अजयपूर ता. जि. चंद्रपूर येथील सव्हे नंबर 187 मधील हे.0.80 आर. शेतजमीन श्रीमती बिचीत्रा दिलीप मंडल, प्रिया दिलीप मंडल आणि गणेश दिलीप मंडल यांचेकडून सदर शेतजमीन मीं खरेदी केली. सदर शेतजमीनीकरीता पैसे माझे वडील सेवानिवृत्त झाल्याने त्यांना मिळालेल्या पैशातून 21,60,000/-रू ला सदरची शेतजमीन मी विकत घेतली आहे. ज्यावर यापूर्वीपासून कुकूटपालन करिता शेड तयार करण्यात आलेला होता.
त्यापूर्वी सदर शेतजमीन ही श्री. रामदास रामचंद्र ढोरे रा. मुल यांचे मालकीची होती. परंतु श्री.रामदास ढोरे आणि बिचित्रा मंडल यांनी आजपावेतो सदर जमीनीचा टॅक्सचा भरणा केलेला नसल्याने आणि मला सदर जागेवर कुकूटपालनाचा व्यवसाय पुन्हा सुरू करायचा असल्याने दिनांक 08/01/2025 रोजी दुपारी अंदाजे 12/00 ते 01/00 वा. चे दरम्यान मी फेरफार करीता ग्राम पंचायत अजयपूर येथे जावून ग्राम पंचायत चपराशी श्री. संतोष डहारे यांचेकडे रितसर कागदपत्रे सादर केली होती. त्या दिवशी ग्रामसेवक श्री. विकास तेलमासरे हे हजर नसल्याने त्यांचा मोबाईल क्रमांक 7387531486 हा संतोष डहारे यांचेकडून घेतला व त्यांचे मोबाईलवर फोन लावून ''मी फेरफार नोंद करिता ग्राम पंचायत येथे कागदपत्रे दिलेली असून मला कुकूटपालनाकरिता ग्राम पंचायतचे ना हरकत प्रमाणपत्राची आवश्यकता आहे'' असे सांगितले. त्यावर ते मला म्हणाले की ''तुम्हाला त्या आधी जागेचा संपुर्ण टॅक्स भरावा लागेल. त्यानंतरच ना हरकत आणि फेरफार करून मिळेल''.
त्यानंतर मी दिनांक 22/01/2025 रोजी पुन्हा ग्राम पंचायत अजयपूर येथे टॅक्स भरण्याकरिता गेलो असता ग्राम

सेवक श्री. विकास तेलमासरे हे हजर नव्हते. तेव्हा मी श्री. डहारे यांचेकडे थकबाकी असलेला टॅक्स एकूण 70,602/-रू. चा भरणा केला. याबाबत टॅक्स पावती श्री. डहारे यांचेकडून घेतली. त्यावेळी त्यांनी मला असे सांगितले की ''ज्यावेळी आमसभा असेल ती तारीख मी तुम्हाला कळवतो'' असे सांगीतले. त्यांनतर दिनांक 12/02/2025 रोजी मौजा अजयपूर येथे माझे कुकूटपालन असलेल्या शेतजमीनीवर भूमीपूजनाचा कार्यक्रम असल्याने त्या कार्यक्रमात ग्राम पंचायत चपराशी श्री. डहारे हे सुध्दा आले होते. त्यावेळी त्यांनी मला सांगितले की, दिनांक 14/02/2025 रोजी ''आमसभा'' आयोजित केली आहे. तेव्हा मी दिनाक 14/02/2025 रोजी अजयपूर येथे आमसभेला गेलो असता आमसभेत ग्रामसेवक श्री. विकास तेलमासरे, सरपंच श्रीमती नलु तलांडे, आणि इ्तर 6-7 सदस्य उपस्थित होते. आमसभेत माझे फेरफारचा विषय ठेवण्यात आला असता मी माझे फेरफारचे नोंद व कुकूटपालनाचे व्यवसायाकरिता ना हरकत प्रमाणपत्राबाबत विचारणा केली असता सरपंच श्रीमती नलु तलांडे यांनी मला ''ठिक आहे बघून घेवू.'' असे म्हणाल्या. आमसभा संपल्यानंतर मी गावचे उप सरपंच श्री. बंडू यांचेसोबत ग्रामपंचायतचे आवारात बोलत असतांना ग्रामसेवक तेलमासरे आणि सरपंच नलु तलांडे हया ग्राम पंचायतचे गेट जवळ बोलत असतांना मला दिसले. काही वेळाने सरपंच नलु तलांडे हया तिथून निघून गेल्या. त्यानंतर मी परत येत असतांना ग्रामसेवक तेलमासरे यांनी मला त्यांचे कक्षामध्ये बोलावून म्हणाले की, '' माझे आत्ताच सरपंच बाईसोबत बोलणे झाले आहे. ''सरपंच बाई मला तुमच्या फेरफारचे नोंद कामाकरीता व नाहरकत प्रमाणपत्र देण्याकरीता माझेसाठी 10,000/रु. घेण्यास सांगीतले असुन तुमचे फेरफार मीच करणार, ना हरकत प्रमाणपत्र मीच देणार असून तुला फेरफार नोंद आणि ना हरकत प्रमाणपत्राकरिता सरंपच यांचेककरिता 10,000/-रू. आणि माझे साठी पण 10,000/-रू. दयावे लागतील'' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना, आपण हिशोबाने बोला असे ग्राम सेवक यांना म्हणालो. तेव्हा त्यांवर ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांनी मला ''ठिक आहे 8,000/-रू. माझे आणि 10,000/-रू. सरपंचाचे असे मिळूण 18,000/-रू. माझेकडेच देशील'' म्हणाले. त्यावर मी त्यांना ठिक आहे वडीलांना विचारून पाहतो असे म्हणून तेथून निघून आलो.

त्यानंतर दिनांक 18/02/2025 रोजी मी चंद्रपूर येथे हजर असतांना दुपारी अंदाजे 12/36 वा. दरम्यान ग्रामसेवक श्री. विकास तेलमासरे यांचे मोबाईल क्रमांक 7387531486 वरून मला दोन वेळा फोन आला व म्हणाले की, ''पैसे घेवून ये'' त्यावर मी त्यांना ''तुम्ही एन. ओ. सी. तयार करून ठेवली आहे काय?'' अशी विचारणा केली असता त्यांनी ''तुम्ही पैसे घेवून येत आहे काय?'' असे विचारले त्यावर मी ''आता पैसे घेवून येत नाही'' म्हणालो असता त्यांनी ''जो पर्यत पैसे घेवून येत नाही. तोपर्यंत एन.ओ.सी. तयार करून ठेवणार नाही'' म्हणाले.'' आणि फोन ठेवून दिला.

दिनांक 28/02/2025 रोजी मी दुपारी अंदाजे 01/00 वा. चे दरम्यान पुन्हा ग्राम पंचायत अजयपूर येथे माझे जमीनीचे फेरफार नोंद आणि कुकूटपालन करिता ना हरकत प्रमाणपत्राबाबत विचारणा करायला ग्रामसेवक तेलमासरे यांचेकडे गेलो आणि त्यांना विचारणा केली असता त्यांनी 'तुम्ही पैसेच नाही दिले तर तुमचे काम कसे होणार.'असे मला म्हणाले. त्यानंतर मी दिनांक 08/01/2025 रोजी ग्राम पंचायत अजयपूर येथे दिलेल्या माझे अर्जाची रिसीव्ह कॉपी त्यांना मागीतली असता त्यांनी ''तुला त्याचे काय काम आहे. पैसे घेवून ये काम होवून जाईल' असे म्हणाले. त्यावर मी त्यांना नाइलाजास्तव होकार देवुन चंद्रपूर येथे घरी परत आलो. त्यांनतर मी ग्रामसेवक श्री. तेलमासरे व सरपंच श्रीमती नलु तलांडे यांनी मला पैशाची मागणी केल्याने मी दिलेल्या माझे शेतीचे फेरफारची नोंद व कुकुटपालनच्या व्यवसायाकरीता नाहकरत प्रमाणपत्र देण्याकरीता खरच पैसे लागतात काय याबाबत माहिती काढली. त्यानंतर मला माहिती पडले की. सदर कामाकरीता कोणतेही पैसे लागत नसल्याने विनामुल्य दाखले मिळत असतात असे मला माहिती झाले. तसेच मी माझ्या कुकूटपालना बाबत काय काय साहीत्य लागते याबाबत माहिती घेण्याकरीता बाहेरगावी जाणे येणे झाल्याने मला तक्रार देण्यासाठी उशीर झाला.

त्यानंतर मी आज रोजी दिनांक 01/03/2025 रोजी दुपारी 13/30 वा. लाचलुचपत प्रतिबंधक विभाग चंद्रपुर येथे येवुन मी अजयपूर येथे विकत घेतलेल्या सव्हे नंबर 187 मधील हे.0.80 आर. शेतजमीनीचा फेरफार करून नोंद देणे आणि त्यावर कुकुटपालनाचे व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे कामाकरीता मला श्री. विकास तेलमासरे, ग्रामसेवक, ग्रामपचांयत अजयपुर यास 8,000/-रुपये व श्रीमती नलु तलांडे, सरपंच, ग्रामपचांयत अजयपुर यांना 10,000/- रूपये असे एकुण 18,000/-रुपयाची मागणी झालेली रक्कम शासकीय नसुन लाच रक्कम असल्याची माझी खात्री झाली. त्यामुळे माझी मुळीच इच्छा नसल्याने सदरची तक्रार तुम्हाला देत आहे. मला लाच मागणारे श्री. विकास तेलमासरे, ग्रामसेवक, ग्रामपचांयत अजयपुर व श्रीमती नलु तलांडे, सरपंच, ग्रामपचांयत अजयपुर यांचेशी माझा कोणताही आर्थिक व उसनवारीचा व्यवहार नाही. सदर कार्यवाहीकरीता आवश्यक असलेली 18000/- रुपये हे माझे वैयक्तीक बचतीतुन जमा करण्यात आलेली आहे. सदरची रक्कम आपणाकडे लाच रक्कम म्हणुन वापरण्याकरीता देत असुन त्यांचेवर कार्यवाही होणेस विनंती आहे.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक श्रीमती भोसले मॅडम यांनी त्यांचे कार्यालयात हजर असलेल्या स्टाफची ओळख करुन देउन पोलीस अंमलदार अमोल सिडाम यांना अंदाजे 14/00 वा. दरम्यान मा. विभाग नियंत्रक, राज्य परीवहन, चंद्रपूर यांचे नावे दोन शासकीय पंच मिळणेबाबतचे पत्र दिले त्यांनंतर अंदाजे 16/00 वा. चे दरम्यान पो.अ. अमोल सिडाम यांनी विभाग नियंत्रक, राज्य परीवहन, चंद्रपूर येथुन दोन पंच आणल्यांनतर पोलीस उपअधिक्षक श्रीमती भोसले मॅडम यांनी दोन्ही पंचाना त्यांचे कार्यालयीन स्टाफ व माझी ओळख करून दिली. त्यानंतर पो.उपअधि. भोसले मॅडम यांनी दोन्ही पंचांना माझे तक्रारीबाबत थोडक्यात हकिकत सांगुन माझ्या सहीची लेखी तक्रार पंचांना वाचण्यास दिली. त्यानंतर सदरच्या लेखी तक्रारीवर दोन्ही पंचांनी व पो.उपअधि. भोसले मॅडम यांनी तक्रारीवर स्वाक्षरी केली.

त्यानंतर पो.उपअधि. भोसले मॅडम यांनी सदर सापळा कार्यवाहीसाठी वापरण्यात येणारी लाच रक्कम 18,000/- (रू.500/- दराच्या 36 चलनी नोटा) नोटांचे क्रमांक नोंदवुन घेण्यात आले. भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन कार्यालयीन कर्मचारी यांनी एका कोऱ्या कागदावर अँथ्रासिन पावडर ने बोटानी रेघ ओढली. त्यानंतर खोलीमधील सर्व दारे खिडक्या बंद करुन अल्ट्राव्हायलेट टॉर्च मारण्यात आला असता पाढऱ्या कोऱ्या कागदावर निळसर रंगाची रेघ उमटून दिसून आली. अशा प्रकारे अँथ्रासीन पावडरचे गुणधर्म व प्रात्याक्षीक करुन दाखविले. त्यानंतर पो. उपअधि. भोसले मॅडम यांनी दिलेल्या सूचनेवरुन पो.हवा. हिवराज नेवारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर कश्याप्रकारे काम करतो. याबाबत सविस्तर माहीती दिली. त्यानंतर पो.उपअधि. भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष लाच मागणीची पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगुन पडताळणी दरम्यानचे संभाषण डिजीटल व्हॉईस रेकॉर्डरद्वारे रेकॉर्ड करण्यात येणार असल्याचे सांगीतले आणि पडताळणी कारवाईच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सविस्तर सुचना दिल्या. त्यानंतर पो.उपअधि. भोसले मॅडम यांनी मला गैरअर्जदार विकास तेलमासरे, ग्रामसेवक, व श्रीमती नलु तलांडे, सरपंच, दोन्ही ग्रामपचांयत अजयपुर हे कुठे मिळतील याबाबत विचारले असता त्यावर मी त्यांना सांगीतले की, ग्रामसेवक तेलमासरे हे फोन करून मला ग्रामपंचायत अजयपूर येथे लाच रक्कम घेवून येण्यास सांगणार आहेत असे सांगितले. त्यावर पोउपअधि. भोसले मॅडम यानीं मला, दोन्ही पंच व सापळा पार्टीतील कर्मचा-यांना गोपनियता बाळगण्याच्या सुचना देवून सदरची पडताळणी/सापळा पंचनामा कार्यवाही ही गैरअर्जदार यांचा फोन आल्यानंतर करण्यात येणार असल्याचे ठरविण्यात आले.(सविस्तर कार्यवाही पंचनामा क्र. 1 मध्ये नमुद आहे)

दिनांक 03/03/2025 रोजी मी गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांच्या फोनची वाट पाहीली. परंतु त्यांचा फोन आला नाही. त्यानंतर दिनांक 04/03/2025 रोजी सकाळी 11/00 वा. माझी होंडा शाईन एसपी 125 कपंनीची मोटार सायकल क्रमांक एम एच 34 बीसी 4449 ने लाचलुपत प्रतिबंधक विभाग चंद्रपूर येथे जावुन पो. उपअधि. भोसले मॅडम भेट घेवून त्यांना आतापर्यत श्री. तेलमासरे, ग्रामसेवक यांचा मला फोन आला नसल्याचे सांगीतले. त्यांवर भोसले मॅडम यांनी सापळा कार्यवाहीतील सदस्यांना बोलावून तक्रारीबाबत पुन्हा समजावुन सांगण्यात आले. त्यानंतर भोसले मॅडम यांनी मला '' गैरअर्जदार श्री. तेलमासरे, ग्रामसेवक व गैरअर्जदार सरपंच श्रीमती नलु तलांडे हे कोठे भेटतील असे विचारले असता मी त्यांना सांगितले की, ते ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर येथे हजर असतील. त्यानंतर पुढील कार्यवाही अजयपुर परिसरात जावुन करावयाचे असल्याबाबत सांगुन मला अंदाजे 11/30 वा. च्या दरम्यान भोसले मॅडम यांनी मी आणलेली होंडा शाईन एसपी 125 कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम एच 34 बीसी 4449 ने मला पूढे मौजा अजयपूर येथे जावुन सुरक्षित ठिकाणी थांबुन राहण्यास सांगीतले. त्यानतर पो.उपअधि. भोसले मॅडम आणि त्यांचा स्टाफ व दोन्ही पंचासह त्यांच्या शासकिय वाहनाने (MH-12-CJ-1533) त्यांच्या कारवाईस लागणाऱ्या संपुर्ण साहित्य घेवून माझ्या मागे येवू लागले. अंदाजे 12/20 वा. मी मौजा अजयपूर येथे सुरक्षित ठिकाणी माझी गाडी थांबवुन उभा असतांना पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांचे वाहन येवून थांबले. व भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार सर्व सापळा कर्मचारी, दोन पंच हे वाहनातुन उतरले. त्यानंतर भोसले मॅडम यांनी सर्वांना माझ्या तक्रारीबाबत परत एकदा थोडक्यात समजावुन सांगीतले.

त्यानंतर पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी पडताळणी कार्यवाही पुर्वीची अंगझडती घेतली. व भोसले मॅडम यांनी मला गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे, ग्रामपंचायत अजयपूर हे त्यांचे कार्यालयात हजर नसल्यास त्यांना माझा मोबाईल क्रमांक 9766880749 वरुन त्यांचे मोबाईल क्रमांक 7387531486 वर फोन लावुन मोबाईल स्पीकर मोडवर ठेवून '' मी ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर येथे आलो असल्याचे सांगावे व आपण कार्यालयात केव्हा येणार याबाबत बोलणी करावी'' असे सांगीतले. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार पो.हवा. हिवराज नेवारे यांनी अंदाजे 12/50 वा. चे दरम्यान व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने पोलीस अंमलदार अमोल सिडाम यांनी माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझी होंडा शाईन एसपी 125 कंपनीची

मोटार सायकल क्रमांक एम एच 34 बीसी 4449 या दुचाकी वाहनाने मी व पंच क्र. 1 गैरअर्जदार श्री. तेलमासरे, ग्रामसेवक यांचे अजयपुर येथील ग्रामपंचायत कार्यालयात पडताळणी करीता गेलो असता पडताळणी दरम्यान गैरअर्जदार श्री. तेलमासरे, ग्रामसेवक हे त्यांचे कार्यालयात हजर नव्हते. त्यामुळे मी माझे मोबाईल क्रमांक 9766880749 वरुन गैरअर्जदार श्री. तेलमासरे, ग्रामसेवक यांचे मोबाईल क्रमांक 7387531486 वर फोन करुन मोबाइल स्पीकर मोडवर ठेवून त्यांचेशी बोलेला असता ''गैरअर्जदार श्री. तेलमासरे, ग्रामसेवक यांना मी ''का आज येऊन नाही राहले का तुम्ही'' असे म्हणालो त्यावर त्यांनी '' नाही इकडे आहो आता जुनोन्याले आहो'' असे म्हणाले त्यावर मी '' अच्छा आज सुट्टीवर आहे का मग'' असे म्हणालो तेव्हा त्यांनी '' जुनोन्यात आहो रे, सुट्टीवर नाही आहो, जुनोना ग्रामपंचायत माझ्याकड आहे न '' असे म्हणाले त्यावर मी त्यांना '' मग आज एनओसी नाही मिळणार'' असे म्हणाले तेव्हा त्यावर त्यांनी '' हो तिकडे आल्यावर, पण आता आज येण होणार नाही न, उद्या वगैरे आलो तर तुला फोन लावतो मग येऊन जा'' असे म्हणाले तेव्हा मी त्यांना '' बर ठिक आहे ठिक आहे'' असे म्हणुन फोन ठेवला''. व पोउपअधि. भोसले मॅडम थांबुन असलेल्या ठिकाणी आम्ही अंदाजे 13/14 वा. परत आलो. त्यानंतर लाचरक्कम मागणीबाबतची पडताळणी कार्यवाही करुन परत आल्याबाबत पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉइस रेकॉर्डर बंद केले. व पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन दोन्ही पंचानी माझी पडताळणी कार्यवाही नंतरची अंगझडती घेतली.
त्यानंतर पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांनी पंच क्र. 01 व 02 यांचेसमक्ष व्हॉईस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण गैरअर्जदार श्री. तेलमासरे, गा्रमसेवक ग्रामपंचायत अजयपुर हे ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर येथे हजर नसुन ते ग्रामपंचायत जुनोना येथे असल्याचे फोनवरती सांगीतले असुन ''मी उद्या आलो, तर तुला फोन लावतो, मग येउन जा'' असे म्हणाले असल्याचे निष्पन्न झाले. त्यावरुन पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांनी सदरची कार्यवाही तात्पुरती स्थगीत ठेवुन दिनांक.05/03/2025 रोजी गैरअर्जदार यांचा मला फोन आल्यावर कार्यवाही करण्यात येईल असे सर्वानुमते ठरविण्यात आले. त्यांनतर भोसले मॅडम यांनी लाचरक्कमेचा असलेला लिफाफा त्यांचे ताब्यात ठेवला. (सविस्तर नोंदी पंचनामा क्र. 2 मध्ये घेण्यात आल्या आहेत.)
त्यांनतर दिनांक 05/03/2025 रोजी मी सकाळी घरी असता अंदाजे सकाळी 7/15 वा. चे दरम्यान गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांचा त्यांचे मोबाइल क्रमांक 7387531486 यावरुन माझे मोबाईल क्रमांक 9766880749 वर फोन आला व म्हणाले की '' मी आज सिंदेवाही येथे मिटींग करीता जाणार आहे. तू 10/00 वाजे पर्यत ग्रामपंचायत अजयपुर येथे ये'' असे म्हणाले तेव्हा मी त्यांना ठीक आहे असे म्हणुन फोन ठेवून दिला. त्यांनतर लगेच पोउपअधि. भोसले मॅडम यांना फोन करुन सदरची बाब सांगीतली. त्यांवर भोसले मॅडम यांनी मला तुम्ही अजयपूर लगत चिचपल्ली जंगल परीसरात सुरक्षित ठिकाणी अंदाजे 09/45 वा. पर्यत तुमची दुचाकी मोटार सायकलसह थांबुन रहा असे सांगीतले. त्यानुसार आज दिनांक 05/03/2025 रोजी मी माझ्या मोटार सायकल ने अजयपूर लगंत चिचपल्ली जंगल परीसरात सुरक्षित ठिकाणी थांबुन असतांना तिथे भोसले मॅडम हे त्यांचे शासकीय वाहनाने पथकासह अंदाजे 09/45 वा. आले. व भोसले मॅडम यांनी सर्वांना माझ्या तक्रारीबाबत परत एकदा थोडक्यात समजावुन सांगीतले.
त्यानतर पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांनी गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे ग्रामपंचायत अजयपूर यांची लाच मागणी पडताळणी कार्यवाही करणार असल्याचे सांगीतले. मला व पंच क्र. 1 यांना पडताळणीबाबत सुचना दिल्या. भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी पडताळणी कार्यवाही पुर्वीची अंगझडती घेतली. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन पो.हवा. हिवराज नेवारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करुन व्हॉइस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हॉइस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने पोलीस अंमलदार वैभव गाडगे यांनी माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझी होंडा शाइन एसपी 125 कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम एच 34 बीसी 4449 या दुचाकी वाहनाने मी व पंच क्र. 1 सह '' गैरअर्जदार श्री. तेलमासरे, ग्रामसेवक यांचे अजयपुर येथील ग्रामपंचायत कार्यालयात पडताळणी करीता अंदाजे 09/56 वा. गेलो असता तिथे गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे हे हजर होते. पडताळणी दरम्यान ''गैरअर्जदार श्री. तेलमासरे, ग्रामसेवक यांनी मला '' अच्छा, अच्छा, दे आणले काय पैसे'' असे म्हणाले त्यावर मी त्यांना '' सर, द्यायचे किती होते पण, द्यायचे किती'' असे म्हणाले तेव्हा त्यांवर त्यांनी ''त्या दिवशी तुले सगळं सांगुन आहे तरी पुन्हा पुन्हा तेच'' असे म्हणाले त्यावर मी त्यांना '' हो पण तुमचे किती, त्यांचे किती'' असे म्हणालो तेव्हा त्यावर त्यांनी '' त्यांचे म्हणजे दहा हजार, त्या दिवशीच बोलला न तु'' असे म्हणाले तेव्हा मी त्यांना '' नाही पण त्यांनी दहा हजार रूपये बोलले होते न, तुम्ही काही कमी करा बा, तुम्ही एक फिक्स सांगान मले '' असे म्हणालो तेव्हा त्यावर त्यांनी '' अरे तर पाच हजार मले दे, दहा हजार इंथ भरल, सरळंच काम आहे'' असे म्हणाले तेव्हा मी त्यांना '' पंधरा हजार रूपये एकुण द्यायचे'' असे

म्हणालो असता त्यावर त्यांनी '' बस'' असे म्हणाले तेव्हा मी त्यांना '' बर आता एकुण पंधरा द्यायचे आहे नं'' असे म्हणालो असता त्यावर त्यांनी '' हो'' असे म्हणुन तडजोडीअंती 5000/रुपये स्वत:करीता व 10,000/रु. ग्रामपंचायत सरपंच श्रीमती नलु तलांडे यांचेकरीता असे एकुण 15,000/रुपये लाचरक्कम स्विकारण्याची तयारी दर्शवील्याने पडताळणी कार्यवाही करुन अंदाजे 10/28 वा. परत आलो व पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉर्इस रेकॉर्डर बंद करण्यात आले. त्यांनतर भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी पडताळणी कार्यवाही नंतरची अंगझडती घेतली.
त्यानंतर पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांनी पंच क्र. 01 व 02 यांचेसमक्ष व्हॉर्इस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण गैरअर्जदार श्री. तेलमासरे, ग्रामसेवक , ग्रामपंचायत अजयपुर यांनी तक्रारदार यांनी अजयपूर येथे ता.जि. चंद्रपूर येथील सव्र्हे नंबर 187 मधील हे. 0.80 आर. शेतजमीनीचा फेरफार करुन नोंद देणे आणि त्यावर कुकुटपालनाचे व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे कामाकरीता स्वत:करीता तडजोडीअंती 5000/रुपये व सरपंच श्रीमती नलु तलांडे यांचेकरीता 10,000/रुपये असे एकुण 15,000/रुपये लाच मागणी करुन उद्या किंवा परवा 15,000/रुपये लाचरक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारण्याची तयारी दर्शवीली असल्याचे पडताळणी कार्यवाहीतील संभाषणावरुन दिसुन येत आहे.
त्यानंतर पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांनी पंचासमक्ष गैरअर्जदार सरपंच, श्रीमती नलु तलांडे, ग्रामपंचायत अजयपुर यांची लाचमागणी पडताळणी कार्यवाही करण्याकरीता लाच मागणी पडताळणी करण्यात येणार असल्याचे सांगीतले. भोसले मॅडम यांनी मला सरपंच श्रीमती नलु तलांडे हया कुठे भेटतील याबाबत विचारले असता, मी त्यांना सरपंच श्रीमती नलु तलांडे हया त्यांचे गांवी मौजा टेमटा येथे त्यांचे घरी असतात असे सांगीतले. त्यांवरुन भोसले मॅडम यांनी मौजा टेमटा येथे जावून पुढील कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगीतले. भोसले मॅडम यांनी मला तुम्ही मौजा टेमटा परीसरात जावुन सुरक्षित ठिकाणी थांबुन रहा. आम्ही तुमच्या मागोमाग शासकीय वाहनाने येत असल्याचे सांगीतले व मी माझे मोटार सायकलनी अंदाजे 11/50 वा. चे दरम्यान माझे दुचाकी वाहनाने निघुण मौजा टेमटा येथे सुरक्षित ठिकाणी आपले वाहन थांबवीले असता माझे मागेच भोसले मॅडम हया त्यांचे शासकीय वाहनासह अंदाजे 12/15 वा. चे दरम्यान  सापळा पथकासह पोहचले. त्यांनतर भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार सर्व सापळा कर्मचारी, दोन पंच हे वाहनातुन उतरले. त्यांनतर भोसले मॅडम यांनी सर्वांना माझ्या तक्रारीबाबत परत एकदा थोडक्यात समजावुन सांगीतले. तसेच मला व पंच क्र. 1 यांना पडताळणीबाबत सुचना दिल्या. भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी पडताळणी कार्यवाही पुर्वीची अंगझडती घेतली. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन पो.हवा. हिवराज नेवारे यांनी व्हॉर्इस रेकॉर्डर सुरू करून व्हाईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाईस रेकॉर्डर काळया धाग्याच्या सहाय्याने पोलीस अंमलदार वैभव गाडगे यांनी माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझी होंडा शाइन एसपी 125 कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम एच 34 बीसी 4449 या दुचाकी वाहनाने मी व पंच क्र. 1 सह गैरअर्जदार सरपंच श्रीमती नलु तलांडे यांचे राहते मौजा टेमटा येथील घरी जावुन पडताळणी दरम्यान गैरअर्जदार सरपंच श्रीमती नलु तलांडे, ग्रामपंचयात अजयपुर यांना मी म्हटले की,'' बाबुला लावलो होतो फोन, तर त्यांनी काहीक पैश्याची मागणी केली होती, का बा तलांडे मॅडमचे दहा हजार रूपये आहेत, आणि म्हणे माझे आठ, दहा म्हटले होते, त्याच्यामधुन आठ हजार रूपये म्हटले, आज गेलो होतो मी तर पाच हजार रूपये माझे म्हणत होते, एकुण पंधरा हजार रूपये त्यांनी मांग केली आहे. तर मी हेच विचारायसाठी आलो होते की बा, कोणाचे किती द्यायचे आहे बा'' असे म्हणालो असता त्यावर गैरअर्जदार सरपंच श्रीमती नलु तलांडे यांनी ''  आता एनओसी साठी लागेलच काही अस बी नाही आहे न होणार नाही'' असे म्हणाले त्यावर मी त्यांना '' हो पहीले आठ हजार रूपये म्हटले होते, आणि तुमचे दहा हजार रूपये पकडले होते ते, मग त्याच्यानंतर मग गेलो तर आता आज गेलो होतो मी, एनओसीसाठी, मला अर्जंट होती, तर म्हणे वारंवार का एकच एक सांगायच तुला, तर माझे पाच हजार रूपये देवुन दे म्हणे आणि तलांडे मॅडमचे जे काही आहे म्हणे, मागे मिटींग मध्ये सांगितल का दहा हजार रूपये'' असे म्हणालो तेव्हा त्यावर त्यांनी'' आमचे आम्हाले देवुन द्यान'' असे म्हणाले असता त्यावर मी त्यांना '' तुमचे तुम्हाला द्यायचे आहे, म्हणजे दहा हजार रूपये, मग त्याची काही रिसीप्ट वगैरे मिळणार का'' असे म्हणालो असता तेव्हा त्यावर त्यांनी '' रिसीप्ट मिळणार नाही'' असे म्हणुन 10,000/रुपये स्वत:करीता व ग्रामसेवक तेलमासरे यांचे त्यांचेकडेच 5000/रुपये देण्याकरीता तक्रारदार यांना स्वत:करीता 10,000/रुपयाची लाचरक्कम मागणी करुण स्विकारण्याची तयारी दर्शवील्याने पडताळणी कार्यवाही करुन परत आलो व पंच क्र. 01 यांच्या आवाजात प्रमाणपत्राचे वाचन केल्यानंतर व्हॉईस रेकॉर्डर बंद करण्यात आले. त्यांनतर भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी पडताळणी कार्यवाही नंतरची अंगझडती घेतली.  त्यानंतर पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांनी पंच क्र. 01 व 02 यांचेसमक्ष व्हॉर्इस रेकॉर्डमध्ये झालेले संभाषणाची टेप ऐकुण गैरअर्जदार

श्रीमती नलु तलांडे, सरपंच, ग्रामपंचायत अजयपुर यांनी तक्रारदार यांनी अजयपूर ता.जि. चंद्रपूर येथे विकत घेतलेल्या सव्र्हे नंबर 187 मधील हे. 0.80 आर. शेतजमीनीवर असलेल्या कुकुटपालनाचे व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे कामाकरीता स्वत:करीता 10,000/रुपये व ग्रामसेवक श्री. तेलमासरे ग्रामपंचायत अजयपुर यांचे त्यांचेचकडे 5000/रु. देण्याकरीता तक्रारदार यांना स्वत:करीता 10,000/रुपये लाच मागणी करुन उद्याला 10,000/रुपये लाचरक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारण्याची तयारी दर्शवीली असल्याचे पडताळणी कार्यवाहीतील संभाषनावरुन दिसुन येत आहे.
त्यांनतर पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांनी सांगीतले की, गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे ग्रामपंचायत अजयपूर यांनी तक्रारदार यांनी अजयपूर ता. जि.चंद्रपूर येथे विकत घेतलेल्या सव्र्हे नंबर 187 मधील हे. 0.80 आर. शेतजमीनीचा फेरफार करून देणे आणि त्यावर कुकुटपालनाचे व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे कामाकरीता तडजोडीअंती स्वत:करीता 5000/रुपये व सरपंच श्रीमती नलु तलांडे यांचेकरीता 10,000/रुपये असे एकुण 15,000/रुपये लाच मागणी करुन उद्या किंवा परवा 15,000/रुपये लाचरक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारण्याची तयारी दर्शवीली आहे तसेच गैरअर्जदार श्रीमती नलु तलांडे, सरपंच, ग्रामपंचायत अजयपुर यांनी तक्रारदार यांनी अजयपूर ता.जि. चंद्रपूर येथे विकत घेतलेल्या सव्र्हे नंबर 187 मधील हे. 0.80 आर. शेतजमीनीवर असलेल्या कुकुटपालनाचे व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे कामाकरीता स्वत:करीता 10,000/रुपये व ग्रामसेवक श्री. तेलमासरे ग्रामपंचायत अजयपुर यांचे त्यांचेचकडे 5000/रु. देण्याकरीता तक्रारदार यांना स्वत:करीता 10,000/रुपये लाच मागणी करुन उद्याला 10,000/रुपये लाचरक्कम तक्रारदार यांचेकडून स्विकारण्याची तयारी दर्शवीली असल्याने त्यावरुन भोसले मॅडम यांनी पडताळणी कार्यवाही दरम्यान दोन्ही गैरअर्जदार यांनी लाच मागणी केल्याप्रमाणे जे गैरअर्जदार ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर येथे दिनांक 06/03/2025 रोजी हजर असतील त्यांचेविरुध्द पुढील सापळा कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले. व दिनांक 05/03/2025 रोजीची सदरची कार्यवाही तात्पुरती स्थगित ठेवण्यात येत असल्याचे सांगीतले. त्यांनतर भोसले मॅडम यांनी लाचरक्कमेचा असलेला लिफाफा त्यांचे ताब्यात ठेवला. (सविस्तर कार्यवाही पंचनामा क्रमांक 3 मध्ये नमुद आहे.)
त्यांनतर मी दि.06/03/2025 रोजी माझे घरी हजर असतांना सकाळी 08/06 मी. नी गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांचा त्यांचे मोबाइ्इल क्रमांक 7387531486 यावरुन माझे मोबाईल क्रमांक 9766880749 वर फोन आला परंतु मी सदरचा फोन उचलला नाही. त्यांनतर लगेच मी, पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांना त्यांचे मोबाईल क्रमांक 9322253372 वर माझे मोबाइ्इल वरुन फोन केला व त्यांना ग्रामसेवक तेलमासरे यांचा मला फोन येत असुन मी त्यांचेशी काय बोलायचे याबाबत विचारले. त्यांवर भोसले मॅडम यांनी मला ''त्यांचेशी मोबाईलवर बोलणी करुन त्यांनी मागणी केल्याप्रमाणे पैसे बाबत बोलल्यास, पैसे घेवून केव्हा, कुठे यायचे याबाबत बोलावे'' असे सांगीतले. त्यांनतर मी माझे मोबाईल क्रमांक 9766880749 वरुन ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांचे मोबाइ्इल क्रमांक 7387531486 वर 08/09 मिनिटांनी कॉल केला असता ग्रामसेवक तेलमासरे यांनी ''मी पंचायत समिती चंद्रपूर येथे मिटींग करीता येत आहे. तू तिथे आला की फोन कर, मी येवून जाणार, व तू काल म्हटल्याप्रमाणे पैसे घेवून येशील आणि तुझा नमुना 8 घेवून जाशील'' असे म्हणाले तेव्हा मी त्यांना ठिक आहे असे म्हणुन फोन ठेवून दिला. त्यांनतर लगेच मी भोसले मॅडम यांना फोन करुन सदरची बाब सांगीतली. त्यावर त्यांनी मला अँन्टी करप्शन ऑफीस चंद्रपूर येथे सकाळी 10/00 वा. स्वताची मोटार सायकल घेवून हजर येवून पुढील सापळा कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगीतले.
त्यांनतर मी अँन्टी करप्शन ऑफीस चंद्रपूर येथे सकाळी 10/00 वा. माझी होंडा शाइ्इन एसपी 125 कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम एच 34 बीसी 4449 या दुचाकी वाहनाने हजर आलो. पोलीस उपअधिक्षक भोसले मॅडम यांनी सर्वांना माझ्या तक्रारीबाबत परत एकदा थोडक्यात समजावुन सांगीतले. गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे ग्रामपंचायत अजयपुर यांनी तक्रारदार यांना सकाळी फोन करुन लाचरक्कम पंचायत समिती चंद्रपूर येथे घेवून येण्याचे सांगीतले असल्याने गैरअर्जदार ग्रामसेवक तेलमासरे ग्रामपंचायत अजयपूर यांनी पडताळणी कार्यवाही दरम्यांन तक्रारदार यांनी अजयपूर ता.जि.चंद्रपूर येथील सव्र्हे नंबर 187 मधील विकत घेतलेल्या हे. 0.80 आर. शेतजमीनीचा फेरफार करून नोंद देणे आणि त्यावर कुकुटपालनाचे व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे कामाकरीता तडजोडीअंती स्वत:करीता 5000/रुपये व सरपंच श्रीमती नलु तलांडे यांचेकरीता 10,000/रुपये असे एकुण 15,000/रुपये लाच मागणी केल्याने व सदरची लाचरक्कम आज रोजी पंचायत समिती येथे घेवून येण्याचे सांगीतले असल्याने गैरअर्जदार ग्रामसेवक तेलमासरे यांचेविरुध्द पुढील सापळा कार्यवाही करण्यात येणार असल्याचे सांगीतले.
त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार दोन्ही पंचानी माझी सापळा कार्यवाही पुर्वीची अंगझडती घेतली. त्यांनतर

भोसले मॅडम यांनी सिलंबद लिफाफा मधुन जमा असलेले पैसे 15,000/रुपये काढण्यात आली. भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार पोहवा अरुण हटवार यांना सदर नोटांना अँथ्रासिन पावडर लावण्याकरीता सांगीतले. त्यावरुन त्यांनी सर्व नोटांना अँथ्रासिन पावडर लावली. त्यांनतर भोसले मॅडम यांचे सुचनेनुसार सदर कर्मचारी यांनी अँथ्रासिन पावडर लावलेले 15,000/रु लाचेची रक्कम ती माझे फुलपँटच्या मागील उजव्या बाजुचे खिशात अलगद ठेवण्यात आली. सापळा कार्यवाहीच्या वेळी घ्यावयाच्या दक्षतेबाबत सुचना देवून भोसले मॅडम यांनी मला सांगितले की, ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांचे मोबाइल क्रमांक 7387531486 वर माझे मोबाइल क्रमांक 9766880749 वरुन फोन करुन मोबाइल स्पीकर मोडवर ठेवून पंचायत समिती कार्यालय चंद्रपूर येथील मुख्य प्रवेशद्वारा जवळ आलो असल्याचे सांगावे. व गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे, ग्रामपंचयात अजयपूर यांनी लाच रक्कम मागणी केल्यास फुल पॅन्टच्या मागील उजव्या बाजुस असलेल्या खिशात ठेवलेली रक्कम उजव्या हातानी काढुन गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांना द्यावी. ''गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांनी एकुण लाचरकमेपैकी मागणी केल्याप्रमाणे स्वत:करीता 5000/रुपयेचं देण्याचे म्हटल्यास त्यांना एकुण 15,000/रु. लाचरकमेतुन 5000/रुपये काढून द्यावे. जर त्यांनी गैरअर्जदार सरपंच श्रीमती नलु तलांडे ग्रामपंचायत अजयपूर यांनी मागणी केल्याप्रमाणे त्यांचेसुध्दा 10,000/रुपये स्वत:कडेच देण्याचे म्हटल्यास त्यांना एकुण मागणी प्रमाणे स्वत:करीता असलेले 5000/रु. व गैरअर्जदार सरपंच श्रीमती नलु तलांडे यांचे 10,000/रु. असे एकुण 15,000/रुपये अॅन्थ्रासी पावडर लावलेल्या लाचरकमेच्या नोटा द्याव्यात.'' तसेच गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांनी लाच रक्कम स्विकारल्यावर फुलपँटच्या डाव्या खिशातुन डाव्या हाताने रुमाल काढून हाताने रुमालीने चेहरा फुसून डाव्या हातात रुमाल ठेवून इशारा करण्याबाबत मला सांगीतले. त्यावेळी सापळा पथकातील सदस्य इशारा मिळताच लाच रक्कम स्विकारणाऱ्यास रंगेहाथ पकडतील असे सांगण्यात आले. त्यानंतर भोसले मॅडम यांचे सुचनेवरुन पो.हवा. हिवराज नेवारे यांनी व्हॉईस रेकॉर्डर सुरू करून व्हॉईस रेकॉर्डरवर पंच क्र. 01 यांनी त्यांचे आवाजात पडताळणी कार्यवाही करीता जात असल्याचे प्रमाणपत्राचे वाचन करुन व्हाइस रेकॉर्डर काळ्या धाग्याच्या सहाय्याने पोलीस अंमलदार वैभव गाडगे यांनी माझे गळयात छातीभागावर लटकवून कोणालाही दिसणार नाही अशा रितीने सुरक्षित ठेवले. त्यानंतर माझी होंडा शाईन एसपी 125 कंपनीची मोटार सायकल क्रमांक एम एच 34 बीसी 4449 या दुचाकी वाहनाने अंदाजे 11/26 वा. रवाना केले. त्यांनतर मला, पंच क्र. 01 यांचेसह गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांनी सांगीतल्याप्रमाणे पंचायत समिती कार्यालय चंद्रपूर येथे जाण्यास रवाना केले. सापळा पथकातील सदस्य माझे मागोमाग शासकिय वाहनाने आले. मी व पंच क्र. 1 पंचायत समिती कार्यालय चंद्रपूर येथील मुख्य गेट जवळ पोहचलो. त्यांनतर गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांचे मोबाईल क्रमांक 7387531486 वर माझे मोबाईल क्रमांक 9766880749 वरुन फोन करुन मोबाईल स्पीकर मोडवर ठेवून ''पंचायत समिती कार्यालय चंद्रपूर येथे मुख्य गेट जवळ आलो'' असल्याचे सांगीतले. त्यानंतर लगेच ते पंचायत समितीचे मुख्य प्रवेशद्वाराजवळ येवून मला हात दाखवीला. तेव्हा मी त्यांचेजवळ गेलो. त्यानंतर गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे यांना मी '' सर ते, सरपंच आपली तलांडे मॅडम त्यांचेपण घेवुन आलो होतो पैसे. तुम्हाले मनल्याप्रमाणे पाच हजार रूपये तुमचे आणि दहा हजार रूपये.त्यांचे. काल गेलो होतो त्यांच्याकडे, त ते मटले का माझे पैसे मा÷याकडेच दे. तर मी आणले आहे पुर्ण पैसे'' असे म्हणालो तेव्हा त्यावर त्यांनी '' हु अं'' असे म्हणाले तेव्हा मी त्यांना '' त कसं कराचं कि त्यांचे पैसे तुमच्याकडे दयायचे कि त्यांच्याकडे'' असे म्हणालो तेव्हा त्यांनी '' कोणाचे'' असे म्हणाले त्यावर मी त्यांना '' सरपंच बाइचे, तुमचे पैसे '' असे म्हणालो तेव्हा त्यांनी '' माझे मले देवून दे आज'' असे म्हणाले तेव्हा मी त्यांना '' आता देवून देवू'' असे म्हणालो असता त्यावर त्यांनी '' हो'' असे म्हणाले त्यावेळी मी माझ्या फुलपँटच्या मागील बाजुस असलेल्या उजव्या खिशात असलेली अँथ्रॅसिन पावडर लावलेली 15,000/रुपये काढून त्यापैकी 5,000 /रु. रक्कम उजव्या हातानी काढून दिले असता, ती रक्कम गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे, ग्रामपचांयत अजयपुर यांनी त्यांच्या उजव्या हातात घेतली व सदरची रक्कम त्यानी आपले फुलपँटच्या मागील उजव्या बाजुस असलेल्या खिशात ठेवली. त्यानंतर मी सापळा पथकास माझे पॅटच्या डाव्या खिशातुन डाव्या हाताने रुमाल काढून हाताने रुमालीने चेहरा फुसुन डाव्या हातात रुमाल ठेवून लाच रक्कम स्विकारल्याचा नियोजीत इशारा केला. त्यावेळी सापळा पथकाने गैरअर्जदार ग्रामसेवक श्री. तेलमासरे, ग्रामपंचायत अजयपुर यांना रंगेहात पकडुन पुढील कारवाइ केली. तसेच गैरअर्जदार सरपंच श्रीमती नलु तलांडे हे त्यांचे गावी मौजा टेमटा ता. जि. चद्रपूर येथे राहत असल्याने गैरअर्जदार सरपंच श्रीमती नलु तलांडे ग्रामपंचायत अजयपुर यांना ताब्यात घेण्यात आले. (याबाबत सविस्तर नोंदी पंचनामा क्र 04 मध्ये घेण्यात आल्या)

तरी आरोपी क्र 1) विकास सुधाकर तेलमासरे, वय 42 वर्षे, गा्रमपंचायत अधिकारी(ग्रामसेवक),ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर ता. जि. चंद्रपूर यांनी आपल्या पदाचा दुरपयोग करुन मी अजयपूर येथे विकत घेतलेल्या सर्हे क्रमांक 187 मधील हे. 0.80 आर. शेतजमीनीचा फेरफार ग्रामपंचायतीमध्ये नोंद करून देणे आणि त्यावर

कुकुटपालनाचे व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे कामाकरीता पडताळणी कार्यवाही दरम्यान स्वत:करीता तडजोडीअंती 5000/रुपये व सरपंच श्रीमती नलु तलांडे यांचेकरीता 10,000/रुपये असे एकुण 15,000/रुपये लाच मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शवीली होती त्यावरुन आज रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्र 1) विकास सुधाकर तेलमासे, गा◌ारमसेवक यांनी फक्त स्वत:करीता 5000/रुपये लाचरकमेची मागणी करुण स्विकारले. तसेच आरोपी क्र. 2) श्रीमती नलु दामोधर तलांडे बय 35 वर्षे, सरपंच,ग्रारमपंचयात अजयपूर ता.जि. चंद्रपूर यांनी सुध्दा पडताळणी कार्यवाही दरम्यान माझे कडून कुकुटपालनाचे व्यवसायासाठी ना हरकत प्रमाणपत्र देण्याचे कामाकरीता स्वत:करीता 10,000/रुपये मागणी करुन स्विकारण्याची तयारी दर्शवीली. त्याकरीता माझी त्यांच्याविरुद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियमान्वये कायदेशीर फिर्याद आहे.

माझी वरिल फिर्याद मराठीत संगणकावर टंकलिखीत केली असुन प्रिंट काढल्यानंतर मी वाचुन पाहीली. ती माझे सांगण्याप्रमाणे बरोबर व खरी आह

समक्ष

(मंजुषा भोसले)
पोलीस उपअधिक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, चंद्रपूर

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Asif Baktawar Sheikh(I (Inspector)) / pcmh86017 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची सवाक्षरी)

ड्यूटी ऑफीसर
पो. स्टे. रामनगर

**Name** (नाव): Asif Baktawar Sheikl
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): pcmh86017

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र)**: Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्टये, व्यंग आणि इतर तपशील))

| **S.No.**(अ.क्र.) | **Sex** (लिंग) | **Date/Year of Birth** (जन्म तारीक/ वर्ष) | **Build** (बांधा) | **Height (cms.)** (उंची(सें. मी.)) | **Complexion** (रंग) | **Identification Mark (s)** (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| **Deformities/ Peculiarities** | **Teeth** (दात) | **Hair** (केस) | **Eyes** (डोळे) | **Habit(s)** (सवयी) | **Dress Habit(s)** (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| **Language /Dialect** (भाषा / बोलीभाषा) | **Place Of** (का स्थान) | | | | | **Others** (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | **Burn Mark** (भाजल्याच्या खुणा) | **Leucoderma** (कोड) | **Mole** (तिळ) | **Scar** (व्रण) | **Tattoo** (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)

## General Diary Details
ठाणे दैनंदिनी तपशील

पोलीस स्टेशन, रामनगर
जि. चंद्रपूर

**State (राज्य):** महाराष्ट्र **District (जिल्हा):** चंद्रपुर

**P.S. (पोलीस ठाणे):** रामनगर

1. **G.D. No. (ठाणे दैनंदिनी क्र.):** 002
2. **G.D. Date & Time (ठा. दै. दिनांक आणि वेळ):** 07/03/2025 00:54 वाजता
3. **G.D. Type (ठाणे दैनंदिनी प्रकार):** इतर करणे नोंद महिला आरोपी क्र 2
4. **Entry for (officer) (करिता नोंद(अधिकारी )):** VILASMAHADEONIMBALKAR /पोलीस हवालदार
5. **Case Type (प्रकरणाचा प्रकार) :**
6. **G.D. Brief (ठाणे दैनंदिनी संक्षिप्त):**
यावेळी आम्ही पोलीस उपअधिक्षक मंजुषा भोसले ACB चंद्रपूर नोंद करते की पो.स्टे रामनगर येथे भ्र.प्र.अधिनियम नुसार गुन्हा CCTNS मध्ये नोंद करत असताना सदर गुन्ह्यासंबधाने परीपुर्ण माहीती भरल्या नंतर आरोपीचा कॉलम मध्ये आरोपी क्र 1) विकास सुधाकर तेलमासरे, वय 42 वर्षे, ग्रामपंचायत अधिकारी(ग्रामसेवक),ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर ता. जि. चंद्रपूर यांचे नावाची नोंद केल्या नंतर महिला आरोपी 2) श्रीमती नलु दामोधर तंलाडे वय 35 वर्षे संरपच ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर ता.जि. चंद्रपूर यांचे नावाची शेवटी नोंद करीत असताना CCTNS संगणक हँग झाले .CCTNS संगणक कोणत्याही प्रकारे काम करीता नव्हते आम्ही CCTNSसंगणक सुरळीत सुरू होण्याची भरपुर वेळ प्रतिक्षा करीत थांबून राहलो. त्यानंतर काही वेळाणे CCTNSसंगणक अटोमँटीक पुर्ण पणे बंद झाले.त्यानंतर CCTNSसंगणक परत नव्याने सुरू करण्यात आले त्या वेळेस आम्ही CCTNSसंगणकमध्ये गुन्हा चेक केला असता गुन्हा क्र 218/2025 कलम 7, 7(अ) भ्र.प्र.अ.1988 सुधारित 2018 असा CCTNSसंगणकात गुन्हा परस्पर नोंद झाला असल्याचे निदेर्शनास आले. सदर गुन्हाची FIR चेक केला असता सदर FIR मध्ये महिला आरोपी 2) श्रीमती नलु दामोधर तंलाडे वय 35 वर्षे संरपच ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर ता.जि. चंद्रपूर यांच्या नावाची नोंद न होता फक्त आरोपी क्र 1) विकास सुधाकर तेलमासरे, वय 42 वर्षे, ग्रामपंचायत अधिकारी(ग्रामसेवक), ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर ता. जि. चंद्रपूर यांच्या नावाची नोंद झाली आहे. तरी सदर गुन्ह्यात महिला आरोपी 2) श्रीमती नलु दामोधर तंलाडे वय 35 वर्षे संरपच ग्रामपंचायत कार्यालय अजयपूर ता.जि. चंद्रपूर यांचे नावाची नोंद स्टेशन डायरीला घेण्यात येत आहे करीता नोंद.
7. **G.D. Subject (ठा. दै. चा विषय):**
अप क्र 218/25 कलम 7, 7(अ) भ्र.प्र.अ.1988 सुधारित 2018 मध्ये महिला आरोपी क्र 2 यांचे नावाची नोंद बाबत
8. **Acts & Sections (अधिनियम आणि कलम):**

| Sr.No. | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|

**Report Printed on**
**(अहवाल मुद्रित केलेला दिनांक):** 07/03/2025

**Report Printed by (द्वारे अहवाल मुद्रित केला):**

**Name (नाव):** Asif Baktawar Sheikh

**Rank (पद):** I (Inspector)

**Signature of G.D. Entry By (ठा. दै. नोंद करणाऱ्याची सही):**

**Name (नाव):** Asif Baktawar Sheikh

**Rank (पद):** I (Inspector)

**No.(क्र.):** pcmh86017

ड्युटी ऑफीसर
पो. स्टे. रामनगर